महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण, १९९६
महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेच्या निधीतून आर्थिक सहाय्य.

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो-१०९६/प्र.क्र. ३३०/क्रीयुसे-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ जुलै १९९७

वाचा :-(१) शासन निर्णय क्र. पीएचई-१८७१/६३९३४/सी. दिनांक २९ सप्टेंबर १९७२.
(२) शासन निर्णय क्र. पीएचई-२०७१/६३९१४/सी. दिनांक २१ सप्टेंबर १९७४.
(३) शासन निर्णय क्र. पीएचई-२०७५/३६१/११, दिनांक २१ जुलै १९७७.
(४) शासन निर्णय क्र. पीएचई-२०७९/४४०४४/११, दिनांक २६ नोव्हेंबर १९८०.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्यात क्रीडा व खेळाच्या विकासासाठी विविध स्तरावर कार्यरत असलेल्या पंजीबद्ध संस्थांना शासनातर्फे महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेच्या निधीतून आर्थिक मदत देण्यात येते. परंतु सदरची आर्थिक मदत इतकी अल्प आहे की, क्रीडा व खेळाच्या विकासासाठी आवश्यक बाबींची पूर्तता करणे या संस्थांना कठीण झाले आहे. आर्थिक मदतीत वाढ करण्याची मागणी क्रीडा क्षेत्रातील सर्वच स्तरावरून सातत्याने येत होती. याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार राज्याच्या क्रीडा धोरणात क्रीडा क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या पंजीबद्ध संस्था, मंडळे, संघटना यांना विविध बाबींवरील आर्थिक मदतीत वाढ करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**शासन निर्णय:**

या योजनेचे यापूर्वीचे शासन निर्णय अधिक्रमित करून महाराष्ट्र राज्यात क्रीडा व खेळाच्या विकासासाठी कार्यरत असलेल्या पंजीबद्ध क्रीडा संस्था, मंडळे तसेच इतर कार्यक्रमाबरोबर क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना परिशिष्टात नमूद केल्यानुसार महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेच्या निधीतून आर्थिक सहाय्य देण्यास शासन मान्यता देत आहे.

नियमांच्या अधिन राहून पात्र संस्थांना अनुदान मंजूर करण्याचे अधिकार संचालक, क्रीडा व युवकसेवा, म. रा., पुणे यांना प्रदान करण्यात येत आहेत.

यावर होणारा खर्च त्या त्या वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यात यावा आणि तो " २२०४-क्रीडा व युवकसेवा-१०४-क्रीडा व खेळ (दोन) (ए) राज्य क्रीडा परिषदेमार्फत क्रीडा संस्थांना सहाय्यक अनुदान-४१-सहाय्यक अनुदान (२२०४-०१९७) योजनेतर तसेच (दोन) (बी) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना--राज्य क्रीडा परिषदेमार्फत क्रीडा संस्थांना अनुदान (२२०४-०६९८) योजनांतर्गत या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

हे आदेश शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहतील.

हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. प्र. क्र. ७३८/व्यय-११, दिनांक २२ जुलै १९९७ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रमेशचंद्र कानडे),
सचिव,
महाराष्ट्र शासन.

## परिशिष्ट

शासन निर्णय क्र. राक्रीधो-१०९६/प्र.क्र. ३३०/क्रीयुसे-१, दिनांक ३१ जुलै १९९७ चे सहपत्र

### '' महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेच्या निधीतून खेळ व क्रीडा विकासाच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या क्रीडा संस्था व इतर कार्यक्रमांवरोवर क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान मंजुरीबाबतची नियमावली ''

**नियम :** १–शिर्षक.—या नियमास '' महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेच्या निधीतून खेळ व क्रीडा विकासाच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या क्रीडा संस्था व इतर कार्यक्रमांबरोबर क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान मंजुरीचे नियम '' असे संबोधण्यात यावे.

**नियम :** २–अंमलबजावणीचा दिनांक.—हे नियम शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहतील.

**नियम :** ३–अनुदानासाठी पात्र संस्था.—(अ) एकविध खेळाच्या राज्य संघटना.

(ब) एकविध खेळाच्या जिल्हा संघटना.

(क) जिल्हा क्रीडा परिषद.

(ड) स्थानिक स्तरावर एक किंवा अनेक खेळांच्या प्रसाराचे आणि विकासाचे कार्य करणाऱ्या संस्था, मंडळे अथवा संघटना.

वर उल्लेखित संस्था सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० आणि/किंवा मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अन्वये नोंदणी असणे आवश्यक.

**नियम :** ४–क्रीडा संस्थांना मान्यता—महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेच्या निधीतून खेळ व क्रीडा विकासाच्या अनुदानासाठी संबंधित क्रीडा संस्थांना क्रीडा व युवकसेवा संचालनालयाची मान्यता घेणे आवश्यक राहील. क्रीडा संस्थांना मान्यता देण्याबाबत शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १. | संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे | अध्यक्ष |
| २. | महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचा एक प्रतिनिधी | सदस्य |
| ३. | शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त २ संघटक (संचालक, क्रीडा नामनिर्देशित करतील) | सदस्य |
| ४. | उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे | सदस्य सचिव. |

क्रीडा संस्थेच्या मान्यतेसाठी खाली नमूद केलेली कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील :—

(अ) सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० व मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अन्वये पंजीबद्ध असल्याबाबतचा दाखला.

(ब) मागील वर्षाचे परिक्षित लेखा विवरणपत्र.

(क) संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची यादी, संस्थेच्या घटनेची प्रत, संस्थेच्या घटनेनुसार मागील वर्षात झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताची प्रत, मागील वर्षांत संस्थेने क्रीडा विषयक केलेल्या कामाचा तपशिल/अहवाल.

(ड) एकविध खेळाच्या राज्य संघटनांनी त्यांच्या खेळाच्या महासंघास सलग्न असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

(इ) एकविध खेळाच्या जिल्हा संघटनांनी त्यांच्या खेळाच्या राज्य संघटनास सलग्न असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

वर उल्लेखित कागदपत्रांसह विहीत नमुन्यातील अर्ज क्रीडा संस्थेच्या मान्यतेसाठी क्रीडा व युवकसेवा संचालनालय, पुणे यांच्याकडे सादर करावा लागेल. राज्यातील क्रीडा संस्थांकडून प्राप्त अर्जांची वरील समितीमार्फत छाननी करण्यात येऊन पात्र संस्थांना संचालनालयामार्फत मान्यतेबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**नियम :** ५–क्रीडा प्रकार—महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेने मान्यता दिलेले सर्व क्रीडा प्रकार अनुदानासाठी पात्र धरण्यात यावे. तथापि, क्रीडा प्रकाराची राष्ट्रीय स्तरावरील कामगिरीचा अनुदानासाठी प्राधान्याने विचार करण्यात यावा.

(१) ॲथलेटिक्स, (२) ॲक्वेटिक्स, (३) आर्चरी, (४) आट्यापाट्या, (५) बॅडमिंटन, (६) बास्केटबॉल, (७) बिलियर्डस, (८) बॉलबॅडमिंटन, (९) ब्रीज, (१०) बॉक्सिंग, (११) बॉडी बिल्डिंग, (१२) क्रिकेट, (१३) सायकलिंग, (१४) कॅरम, (१५) बुद्धीबळ, (१६) प टबॉल, (१७) फेन्सिंग, (१८) जिम्नॅस्टिक्स, (१९) हॅण्डबॉल, (२०) हॉकी, (२१) ज्युदो, (२२) कराटे, (२३) कबड्डी, (२४) खो-खो, (२५) कॅनोईग-कयाकिंग, (२६) मल्लखांब, (२७) पॉवर लिफ्टिंग, (२८) रायफल शूटींग, (२९) रींग टेनिस, (३०) सॉफ्टबॉल, (३१) शूटींग बॉल, (३२) टेबलटेनिस, (३३) टेनिस, (३४) व्हॉलिबॉल, (३५) कुस्ती, (३६) वेटलिफ्टिंग, (३७) यॉटिंग, (३८) रोलर स्केटिंग, (३९) रोईंग, (४०) हॅंगग्लायडींग, (४१) सायकल पोलो.

**नियम :** ६–अनुदानाच्या बाबी—(अ) निर्वाह अनुदान.

(ब) क्रीडा साहित्य खरेदीसाठी अनुदान.

(क) अधिकृत राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या आयोजनासाठी अनुदान.

(ड) क्रीडांगणाची देखभाल व दुरुस्ती.

नियम : ७–अनुदान मंजूरीच्या अटी.––(अ) नियम क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या संस्था संचालनालयाची मान्यता मिळाल्यानंतरच अनुदानास पात्र ठरतील.

(ब) क्रीडा व युवकसेवा संचालनालयाची मान्यता असणे आवश्यक.

(क) अनुदानासाठी विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह संबंधित जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांमार्फत सादर करणे आवश्यक.

(ड) संस्थेस गतवर्षी किंवा यापूर्वी अनुदान मिळाले असल्यास अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र व परिक्षित लेखा विवरणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक.

(इ) संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची यादी अर्जासोबत जोडणे आवश्यक.

(ई) संस्था ज्या नावाने अर्ज करीत असेल त्या नावानेच संस्था नोंदणीचा दाखला आवश्यक.

(प) संस्थेने गतवर्षात त्यांच्या स्तरावर किमान एका खेळाच्या क्रीडा स्पर्धांचे व क्रीडा प्रशिक्षणाचे आयोजन करणे आवश्यक.

(फ) ज्या कारणासाठी शासनाच्या क्रीडा विभागाच्या इतर योजनेतून अनुदान दिले असेल तर त्याच कारणासाठी महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेच्या निधीतून अनुदान मंजूर केले जाणार नाही.

(ग) अधिकृत राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या आयोजनाप्रित्यर्थ अनुदान मंजूरीसाठी संबंधित संघटनेचे संमतीपत्र व खर्चाचे अंदाजपत्रक अर्जासोबत जोडणे आवश्यक.

नियम : ८–अनुदानाचा दर व मर्यादा.––निर्वाह अनुदान.

(अ) **एकविध खेळाच्या राज्य संघटना.**––एकविध खेळाच्या राज्य संघटनेस राज्यातील किमान ५० टक्के जिल्हा संघटना संलग्न असणे आवश्यक. प्रत्येक जिल्ह्यामागे दरवर्षी रु. एक हजार अथवा ग्राह्य बाबी वरील गतवर्षाच्या प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के यापैकी जी रक्कम कमी असेल इतके अनुदान.

(ब) **एकविध खेळाच्या जिल्हा संघटना.**––दरवर्षी कमाल रु. पाच हजार अथवा ग्राह्य बाबीवरील गतवर्षाच्या प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के यापैकी जी रक्कम कमी असेल इतके अनुदान.

(क) **जिल्हा क्रीडा परिषद.**––दरवर्षी कमाल रु. पाच हजार अथवा ग्राह्य बाबीवरील गतवर्षाच्या प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के यापैकी जी रक्कम कमी असेल इतके अनुदान.

(ड) **स्थानिक स्तरावर एक किंवा अनेक खेळांच्या क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्था/मंडळे/संघटना.**––दरवर्षी कमाल रु. पाचशे अथवा ग्राह्य बाबीवरील गतवर्षाच्या प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के यापैकी जी रक्कम कमी असेल इतके अनुदान.

नियम : ९–निर्वाह अनुदानाच्या ग्राह्य बाबी.––निर्वाह अनुदानाच्या मंजूरीसाठी खर्चाच्या खालील बाबी ग्राह्य धरण्यात येतील :––

(अ) व्यवस्थापन खर्च.––लिपिक व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे वेतन/मानधन (त्याच दर्जाच्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनाहून अधिक असू नये) प्रशिक्षकाचे मानधन/प्रवास भत्ता.

(ब) कार्यालयीन खर्च.–– कार्यालयाचे भाडे, लेखनसामुग्री, टपालहशील, विद्युत, छपाई, लेखापरिरक्षण खर्च इत्यादी.

(क) क्रीडा साहित्य देखभाल व दुरुस्ती खर्च.

(ड) स्थानिक स्तरावरील क्रीडा प्रशिक्षण शिबिराचा आयोजनावरील तसेच स्थानिक स्पर्धेत सहभागी होण्यासाठी झालेला खर्च

नियम : १०–क्रीडा साहित्यासाठी अनुदान.––क्रीडा साहित्य खरेदीसाठी खाली नमूद केल्यानुसार अनुदान देण्यात यावे :––

(अ) एकविध खेळाच्या राज्य संघटना कमाल रु. पाच हजार पर्यंत.

(ब) एकविध खेळाच्या जिल्हा संघटना, कमाल रु. पाच हजार पर्यंत.

(क) स्थानिक स्तरावर एक किंवा अनेक खेळांच्या विकासाचे कार्य करणाऱ्या संस्था/मंडळ/संघटना, कमाल रु. दोन हजार पर्यंत.

नियम : ११–अधिकृत राज्यस्तरीय स्पर्धासाठी अनुदान.––संबंधित खेळांच्या अधिकृत राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजनासाठी कमाल रु. एक लाख किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के यापैकी कमी असेल इतके अनुदान.

टीप.––(१) ज्या राज्यस्तरीय स्पर्धेत जिल्ह्याचे प्रातिनिधीक संघ सहभागी होतात अशा स्पर्धांच्या आयोजनासाठी एका आर्थिक वर्षात एका वयोगटासाठी एकदाच अनुदान मंजूर करण्यात येईल.

(२) सदरहू अनुदान पुरुष व महिला खेळाडूंच्या एकत्रित स्पर्धेसाठी देण्यात येईल. पुरुष व महिलांच्या एकाच खेळांच्या स्पर्धा स्वतंत्रपणे आयोजित केल्यास अनुदानाची मर्यादा रु. पन्नास हजार पर्यंत राहील.

नियम : १२–अधिकृत राष्ट्रीय स्पर्धासाठी अनुदान.––संबंधित खेळांच्या अधिकृत राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजनासाठी कमाल रु. दोन लाख किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के यापैकी कमी असेल इतके अनुदान.

टीप.––(१) ज्या राष्ट्रीय स्पर्धेत राज्याचे प्रातिनिधीक संघ सहभागी होतात अशा स्पर्धांच्या आयोजनासाठी एका आर्थिक वर्षात एका वयोगटासाठी एकदाच अनुदान मंजूर करण्यात येईल.

(२) सदरहू अनुदान पुरुष व महिला खेळाडूंच्या एकत्रित स्पर्धेसाठी देण्यात येईल. पुरुष व महिलांच्या एकाच खेळाच्या स्पर्धा स्वतंत्रपणे आयोजित केल्यास अनुदानाची मर्यादा रु. एक लाखपर्यंत राहील.

**नियम : १३**–अधिकृत आतरराष्ट्रीय स्पर्धासाठी अनुदान.--संबंधित खेळाच्या अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पधांचे आयोजनासाठी कमाल रु. दोन लाख किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के यापैकी कमी असेल इतके अनुदान.

**टीप**.--(१) ज्या अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत किमान पाच राष्ट्रांचे संघ सहभागी होतील अशाच स्पर्धांच्या आयोजनासाठी एका आर्थिक वर्षात एकदाच अनुदान मंजूर करण्यात येईल.

(२) सदरहू अनुदान पुरुष व महिला खेळाडूंच्या एकत्रित स्पर्धेसाठी देण्यात येईल. पुरुष व महिलांच्या एकाच खेळाच्या स्पर्धा स्वतंत्रपणे आयोजित केल्यास अनुदानाची मर्यादा रु. एक लाखापर्यंत राहील.

**नियम : १४**–अनुदान मंजुरीचे अधिकार.—जिल्हास्तरीय संस्था/संघटनांना नियमाच्या अधीन राहून अनुदान मंजूर करण्याचे अधिकार संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान करण्यात येत आहे तथापि राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी देय अनुदान, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद यांच्या संमतीनुसार संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे मंजूर करतील.

**नियम : १५**–आहरण व संवितरण अधिकारी---संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

**नियम : १६**–नियम शिथील करण्याचे अधिकार.--नियमात पुर्णतः/अंशतः बदल किंवा शिथील करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास राहतील.

□ □